# स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था

गेट क्र. ८, मुर्तीजापूर रोड, जुन्या नाक्याजवळ, कृषिनगर, अकोला-४४४१०४

**(महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,नागपूर)**

डॉ. एच. एस. बिराडे
एमव्हीएससी, पी.एचडी.
सहयोगी अधिष्ठाता

☎ : 0724 -2258643
फक्स : 0724 -2258644
ईमेल : adpgivas@rediffmail.com


जावक क्र. सह.अधि./स्ना.प.प.वि. संस्था/792/19
सहयोगी अधिष्ठाता यांचे कार्यालय,
स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला
दि. 09/04/2019

## दरपत्रक मागविण्याची सूचना

विषय: ठेका पद्धतीने प्रक्षेत्रावरील मजुरीची कामे करण्यासाठी मोहोरबंद दरपत्रक सादर करण्याबाबत......

स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला येथील पुर्णाथडी म्हैस प्रक्षेत्र व चारा उत्पादन विभागात खालील मजुरीची कामे करण्याकरीता ठेका पद्धतीने काम देण्याचे प्रस्तावित आहे (प्रक्षेत्रावर एकूण ४४ लहान-मोठी जनावरे असून एकूण १७ एकर जमीन आहे.):

कामाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:

१ जनावराच्या गोठ्यातील मलमूत्र दररोज काढणे, गोठा दररोज स्वच्छ करणे, मलमुत्राची नाली साफ करणे, ई.
२ जनावरांना दररोज पाणी पाजणे, चारा/खाद्य टाकणे.
३ जनावरे पाण्याने धुणे, पाण्याची टाकी साफ करणे.
४ जनावरे चारायला नेणे व नंतर परत आणून बांधणे.
५ दररोज दोन वेळा दुध काढणे.
६ संकलित दुध विक्रीस मदत करणे.
७ संकलित दुध सायकल वर कॅन ने दुध डेअरी येथे जमा करणे.
८ जनावरे उपचारासाठी दवाखान्यात नेणे.
९ दुधाच्या कॅन स्वच्छ करणे.
१० गोठ्यातील शेण खड्ड्यात (Manure Pit) पुरणे.
११ खाद्याची पोती/भैली खाद्य भांडार येथून आणणे.
१२ चारा व पशुखाद्याची ने-आण करणे व खाद्य भांडार येथे व्यवस्थित ठेवणे.
१३ परिसरातील गवत काढणे, परिसर स्वच्छ ठेवणे, वाळलेली झाडे तोडणे, झाडाच्या फांद्या छाटणे.
१४ प्रक्षेत्रावरील यंत्रे दुरुस्ती व त्यासारख्या आपात्कालीन कामात मदत करणे.
१५ पेरणीसाठी शेत तयार करतांना मदत करणे.

१६ सऱ्या-वाफे-दांड तयार करतांना मदत करणे.
१७ पेरणी करण्यास मदत करणे.
१८ चारा प्रक्षेत्रावरील चारापिकांना पाणी देणे.
१९ शेतामध्ये खत पसरविणे.
२० गरज पडल्यास पिकांवर कीटकनाशकांची फवारणी करणे.
२१ निंदन करणे.
२२ चारा कापणी करणे.
२३ ठोंब काढणे.
२४ कर्तव्यावर असतांना प्रक्षेत्रावरील मालमत्तेची देखरेख करणे.
२५ वेळेवर उद्भवलेली सर्व कामे करणे.
२६ संबंधित अधिकाऱ्यांनी, वरिष्ठांनी वेळोवेळी सांगितलेली कामे पार पाडणे.

अटी व शर्ती:

1. दर प्रती दिन प्रमाणे नमूद करावे.
2. कंत्राटदाराकडे स्वतःचे बँक खाते व पॅन कार्ड असणे आवश्यक आहे.
3. दरपत्रक/ दरपत्रके स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे पूर्ण अधिकार मा. सहयोगी अधिष्ठाता, स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला यांना राहतील.
4. दरपत्रकावर तसेच सदर दरपत्रक ज्या लिफाफ्यात सीलबंद केले आहे त्या लिफाफ्यावर ठळक अक्षरांत 'दरपत्रक- मजूर कंत्राट- LPM विभाग' असे लिहावे.
5. दरपत्रकावर तसेच सदर दरपत्रक ज्या लिफाफ्यात सीलबंद केले आहे त्या लिफाफ्यावर या दरपत्रक मागविण्याच्या सूचनेचा क्रमांक संदर्भ क्रमांक म्हणून लिहावा.
6. मोहोरबंद दरपत्रके **मा. सहयोगी अधिष्ठाता, स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था (स्नापपविसं), कृषिनगर, अकोला-४ या पत्यावर दिनांक** 22 **/०४/२०१९ च्या सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत** किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.

9/04/2019

**सहयोगी अधिष्ठाता**
स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था,
अकोला-४४४१०४

प्रत:
प्रभारी, इंट्रानेट कक्ष, स्नापपविसं, अकोला यांनी सदर सूचना विस्तृत प्रसिद्धीसाठी महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर तात्काळ प्रकाशित करावी.